कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय लांजा

राष्ट्रीय सेवा योजना विभाग


**( Short term course YOGA & MEDITATION )**

**योग प्रशिक्षण शिबीर** - आय. क्यू. ए. सी. व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'ध्यानधारणा आणि योग प्रशिक्षण' या विषयावर लघु कालावधी प्रमाणपत्र कार्यक्रम (शॉर्ट टर्म कोर्स ) आयोजित करण्यात आला होता**. 4 जून ते 21 जून 2022** या कालावधीमध्ये सकाळी सात ते नऊ या वेळेत कै. रमा नारायण शेट्ये ट्रस्ट, जानकी निवास,लांजा येथे आयोजित केलेल्या या शिबिराला आयुष मंत्रालय प्रमाणित योग शिक्षिका डॉ.प्रीती कुलकर्णी आणि केतकी सावंत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. **या शिबिराचा एकूण 30 विद्यार्थ्यांनी** लाभ घेतला. **21 जून आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या** निमित्ताने आयोजित केलेल्या **कार्यशाळेचा 78** स्वयंसेवक, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थ यांनी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे दुसरे योग प्रशिक्षण शिबीर कोचरी येथे आयोजित केलेल्या निवासी शिबिरामध्ये आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचा 110 लाभार्थीनी लाभ घेतला. डॉ.प्रीती कुलकर्णी,डॉ.प्रशांत कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.









कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय लांजा

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**( ENVIRONMENT AWARENESS AND PLANTATION ABHIYAN )**

**( 4 JULY TO 10 JULY 2022 )**

**पर्यावरण जनजागृती अभियान** - कै.काका सरफरे स्मृती दहावी (एस एस सी )व्याख्यान समिती, शिक्षण विभाग पंचायत समिती, लांजा आणि लांजा तालुका माध्यमिक मुख्याध्यापक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'माजी वसुंधरा' कार्यक्रमांतर्गत पर्यावरण जनजागृती व वृक्ष लागवड आणि संवर्धन **अभियान 4 जुलै ते 10 जुलै 2022** या कालावधीमध्ये राबविण्यात आले होते. या अभियानांतर्गत लांजा तालुक्यातील **24 माध्यमिक विद्यालयांमध्ये** वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या संपूर्ण मोहिमेला श्री दत्ताजी कदम आणि सर्व मुख्याध्यापक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.












कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय लांजा

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**( HAR GHAR  TIRANGA UPAKRAM )**

**( 9 ऑगस्ट ते 17 ऑगस्ट 2022)**

**हर घर तिरंगा उपक्रम** - केंद्र शासनाच्या आजादी का अमृत महोत्सव, हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत 9 ऑगस्ट ते 17 ऑगस्ट 2022 या कालावधीमध्ये सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 9 ऑगस्ट रोजी सामूहिक राष्ट्रगीत गायन, 10 ऑगस्ट - महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता, 11 ऑगस्ट - हर घर तिरंगा जनजागृती पथनाट्याचे सादरीकरण लांजा शहरातील सहा ठिकाणी करण्यात आले. यावेळी जनजागृती रॅलीचे आयोजन देखील करण्यात आले होते. १३ ऑगस्ट - आजादी का अमृत महोत्सव या विषयावर वर्ग सजावट स्पर्धा , 15 ऑगस्ट - पुस्तक प्रदर्शन, 16 ऑगस्ट- विविध अथलेटिक्स क्रीडा स्पर्धांचे आयोजन आणि 17 ऑगस्ट- रोजी देशभक्तीपर शॉर्ट फिल्म प्रदर्शन अशा विविध उपक्रमांनी हा महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.






कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय लांजा

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**( SHIV RAJYABHISHEK DIN )**

**( 6 JUNE 2022)**

**शिवराज्याभिषेक दिन** - 6 जून शिवराज्याभिषेक दिन सांस्कृतिक विभाग आणि क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांच्या आयोजनाने साजरा करण्यात आला. यामध्ये रॅली, क्रीडा विभागाच्या वतीने मॅरेथॉन स्पर्धा तसेच प्रा. मारुती पाटील यांचे शिवराज्याभिषेक दिनाच्या संदर्भातील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

**एनएसएस पब्लिसिटी विक** - 24 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या कालावधीत एनएसएस पब्लिसिटी विक साजरा करण्यात आला. यामध्ये 24 सप्टेंबर एन.एस.एस. स्थापना दिनाच्या निमित्ताने नगरपंचायत लांजाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय ते तहसीलदार कार्यालय या मार्गावर स्वच्छता जनजागृती या विषयावरील रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. 26 सप्टेंबर रोजी पोस्टर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 2 ऑक्टोबर रोजी रूण या दत्तक गावामध्ये आयुषमान हॉस्पिटल लांजा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये नेत्र तपासणी, जनरल आरोग्य तपासणी, हिमोग्लोबिन, इ सी जी, रक्त शर्करा तपासणी इत्यादी विविध आजारांवरील तपासणी आणि उपचारांचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजनाचा 78 लाभार्थ्यांनी लाभ घेतला. रुण गावचे सरपंच श्री मधुकर जाधव आणि त्यांच्या सर्व टीमचे तसेच आयुषमान हॉस्पिटलच्या सर्व डॉक्टरांच्या टीमचे, नेत्ररोग तपासणी करिता श्री सुहास देसाई आणि हिमोग्लोबीन तपासणीसाठी श्री. विक्रांत देवरुखकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**रॅली व एड्स सप्ताह** - 31 ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. 1 डिसेंबर जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून डी.एल.एल.इ. सोबत एड्स जनजागृती , रेड रिबन बांधणे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एड्स सप्ताहाच्या निमित्ताने पाच डिसेंबर रोजी महाविद्यालय मध्ये एचडीएफसी बँकेच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये 42 रक्त संकलन झाले.

**संविधान संवाद अभियान** - 21 नोव्हेंबर ते 26 नोव्हेंबर या कालावधीमध्ये संविधान सप्ताहाच्या निमित्ताने संविधान संवाद अभियान राबविण्यात आले. या अभियाना अंतर्गत लांजा आणि राजापूर तालुक्यातील 25 ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या अभियानामध्ये 25 विद्यार्थिनींनी पथनाट्य सादरीकरण आणि आयोजनामध्ये सहभाग घेतला. सुमारे 5000 लाभार्थींपर्यंत संविधानाचा मूळ

उद्देश पथनाट्याच्या माध्यमातून पोहोचवण्यामध्ये सफलता प्राप्त झाली. त्यानंतर 26 नोव्हेंबर रोजी महाविद्यालयामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. यामध्ये राज्यशास्त्र विभाग,माजी विद्यार्थी असोसिएशन याचे मोलाचे सहकार्य लाभले.

**मतदार दिवस - 25 जानेवारी** रोजी मतदार दिवसाच्या निमित्ताने तहसीलदार कार्यालयापासून केदारलिंग मंदिरापर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

**उत्कर्ष आणि आव्हान मधील सहभाग** - महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राज्यस्तरावरील उत्कर्ष या सामाजिक व सांस्कृतिक युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या युवा महोत्सवासाठी मुंबई विद्यापीठाच्या संघामध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी इशिका कांबळे हिची निवड झाली. सोलापूर येथे 2 ते 5 जानेवारी या कालावधीत सोलापूर विद्यापीठामध्ये आयोजित केलेल्या या युवा महोत्सवामध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत असताना इशिकाने पथनाट्य या कलाप्रकाराचे नेतृत्व केले. ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या राज्यपाल कार्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात येत असलेल्या राज्यस्तरावरील 'आव्हान - चान्स्लर्स ब्रिगेड आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरा' मध्ये महाविद्यालयातील सौरभ पवार, सानिका कनावजे आणि प्रा. अनुप्रिया प्रभू यांनी सहभाग घेतला. एन.डी.आर.एफ च्या वतीने आव्हान शिबिरातील प्रशिक्षणार्थींना दहा दिवस आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षित झालेल्या आपल्या महाविद्यालयातील टीमने अन्य सहकार्यांच्या बरोबर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सात दिवसीय निवासी शिबिरामध्ये तसेच रत्नागिरी जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिरामध्ये सुमारे अडीचशे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले ही गौरवाची बाब आहे. या शिबिराचे नेतृत्व प्रा. अनुप्रिया प्रभू यांनी केले होते.

**आजाद हिंद ची गाथा** - या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयाच्या रा.से.यो.विभागाला एक अनोखी संधी मिळाली होती. आर्टिस्टिक ह्यूमन्स आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय व राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आजाद हिंद ची गाथा या शिर्षका अंतर्गत 23 मार्च रोजी नाटिका सादर करण्याचे आयोजन केले होते. संपूर्ण महाराष्ट्रात 75 संस्था 75 ठिकाणी 75 नाटक एकाच वेळेला सादर करण्याच्या अभिनव उपक्रमामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील दोन महाविद्यालयांमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची निवड करण्यात आली.ही गौरवाची बाब आहे. अतिशय उत्कृष्ट पद्धतीने विद्यार्थ्यांनी या नाटकाचे सादरीकरण केले. आर्टिस्टिक ह्यूमन्सचे डायरेक्टर्स, विद्यार्थी यांच्या प्रयत्नांचे आणि सादरीकरणाचे सर्वांनी खूप कौतुक केले.

**निवासी शिबिर व नेतृत्व प्रशिक्षण शिबिर** - 28 डिसेंबर ते 3 जानेवारी 23 या कालावधीमध्ये सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन लांजा तालुक्यातील कोचरी या गावी करण्यात आले होते. या शिबिरामध्ये 95 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विविध व्याख्यानांच्या उपक्रमांबरोबरच वनराई बंधारे, शोष खड्डे, रस्ते दुरुस्ती आणि स्वच्छता अभियान यासारखे विविध उपक्रम राबविण्यात आले. या शिबिरामध्ये 2 जानेवारी

रोजी मोतीबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन श्री समर्थ ऑप्टिकल्स चे श्री सुहास देसाई यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. 72 रुग्णांनी याचा लाभ घेतला. या शिबिराला कोचरी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, प्रशालेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक, तसेच श्री दत्ताजी कदम यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कै.रमा नारायण शेट्ये ट्रस्ट, लांजा येथे मुंबई विद्यापीठाचे रत्नागिरी जिल्ह्याचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे नेतृत्व प्रशिक्षण शिबिर 27 जानेवारी ते 31 जानेवारी 2023 या कालावधीमध्ये संपन्न झाले. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील 35 महाविद्यालयांचे 72 विद्यार्थी सहभागी झाले होते. रमा नारायण ट्रस्टचे आदरणीय श्री. भाऊ वंजारे आणि त्यांचे जानकी निवास येथील सर्व ककर्मचारी यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे पोलीस मित्र उपक्रमा अंतर्गत गणपती उत्सवाचे दरम्यान पोलीस यंत्रणेला महाविद्यालयातील 20 विद्यार्थांनी वाहतूक नियंत्रणासाठी मदत केली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्व उपक्रम यशस्वी मनाने राबवित असताना मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक व विद्यापीठाचे रजिस्ट्रार प्रा. सुधीर पुराणिक, ओ.एस.डी. प्रा सुशील शिंदे सर, कार्यक्रम अधिकारी प्रा.रमेश देवकर, संस्थेचे सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. के. आर. चव्हाण, माजी विद्यार्थी असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. महादेव बडगे, प्रा. प्राची बामणे, प्रा. अतिका मुजावर, प्रा.अनुप सरदेसाई, प्रा. शशांक उपशेटे, श्री. गणेश शेट्ये तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक मित्र प्राध्यापकेतर कर्मचारी आणि सर्व स्वयंसेवकांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ.राहुल मराठे, डॉ.महादेव बडगे

कार्यक्रम अधिकारी










**संविधान संवाद पथनाट्य**

**२१ नोव्हेंबर - २६ नोव्हेंबर**









RALLY

1. EKATA DOUD 31 OCT.22
2. SWACHATA – 24 Sept.22
3. MAHILA SURAKSHA




DR.SAMEER GHORPADE, DR. SWARUP EKALURE

DR.SUJATA MARATHE ,MR.SUHAS DESAI – EYE

MR.OMKAR DEVRUKHAKAR –MANAS LAB

**FACILITY**

,GENERAL CHECK UP , ECG,BLOOD SHUGAR, HB , EYE CHECKUP

**148 BENF.**

## Health Checkup CAMP AT - RUN TAL -LANJA

# Leadership Training Camp

- Duration – 5 days
- Schedule - 27 January – 31 January 2023
- Level - District - Ratnagiri
- Participation – 72 volunteers
- Colleges - 33 colleges
- Theme - Leadership
- Venue - Late. Rama Narayan Shetye Trust, Lanja






Opening ceremony – Mr. Abhijeet Hegshetye

Dr. Surendra Tahakurdesai




Dr. Mahesh Bavadhankar







REGULAR CAMP – KOCHARI TAL – LANJA 28 December 22 – 3 January 2023











# PARTICIPATION

| Sr. No. | Name of the Camp | No of student | Venue |
|---|---|---|---|
| 01 | Leadership Training Camp | 02 | Lanja |
| 02 | AVHAN DM Training Camp | 02 + 01 PO | Jalgaon |
| 03 | Utkarsh Youth Festival | 01 | Solapur |
| 04 | Gender sensitization FDP | 02 + 02 PO | MSFDA, Pune |
| 05 | Health and Hygiene – Career Guidance – Residential Camp | 30 | Dervan |
| 06 | Organ Donation Workshop | 02 | Online |
| 07 | National Integration Camp | 01 | Kalina |




आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत

75 × 75 × 75

**आजादी कि गाथा** नाट्यसादरीकरण २३ मार्च २३

DIRECTION – DR. RAHUL MARATHE